अधिसूचना

(8)

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:- ३१.४.२००१.

क्र.इएलडी २००१/प्र.क्र.१०६१/ऊर्जा-१ : मुंबई विद्युत शुल्क अधिनियम,१९५८, (१९५८ चा मुंबई चाळीस) याच्या कलम ५-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन लोकहितास्तव आवश्यक आहे असे शासनास वाटल्याने महाराष्ट्र शासन याव्दारे १.४.२००० पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात औद्योगिक ग्राहकाने जनित्र संचाव्दारे निर्माण केलेल्या वीजेचा वापर स्वतः च्या औद्योगिक कारणासाठी केल्यास,अशा वीज वापरावर पंधरा पैशापेक्षा अधिक असेल असे उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग "ग" स्तंभ ४ खालील विद्युत शुल्क भरण्यापासून खालील अटीचा अधीन राहून सूट देत आहे.

ही सूट शासन निर्णय क्र.संकीर्ण १०९९/सीआर-४५५/ऊर्जा-७ दिनाक २५ एप्रिल २००० रोजी जाहीर केलेल्या सुधारित धोरणापूर्वी बसविलेलया जनित्र संचाना लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अरविंद पाटील,
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,चर्नीरोड,मुंबई.

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर अधिसूचना राज्य शासनाच्या भाग ४ ब मध्ये प्रसिध्द करुन १०० प्रती या विभागास पाठविण्याची कृपया व्यवस्था करावी. सदर अधिसुचनेस उप सचिव (ऊर्जा) यांची मान्यता आहे.

(अरविंद पाटील)
शासनाचे अवर सचिव.

प्रत,

प्रधान सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई-३२.
सचिव (उद्योग) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
मुख्य अभियंता (विद्युत),महाराष्ट्र शासन,सार्वजनिक बांधकाम विभाग,नवीन प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,चेंबूर,मुंबई-७१.
विकास आयुक्त (उद्योग) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर,मुंबई-३२.
अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,प्रकाशगड,वांद्रे (पूर्व)मुंबई-५१.
महालेखापाल, महाराष्ट्र-१मुंबई
महालेखापाल,महाराष्ट्र-२ नागपूर.
निवड नस्ती (ऊर्जा-१)

११०६१२००१ELDC००२